Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November -2020

SPECIAL ISSUE - CCLXIV (264)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE









Chief Editor

Prof. Virag S. Gawande

Director

Aadhar Social

Research & Development

Training Institute Amravati

Editor

Dr.S.N.Jadhavar

Head, Deptt. of History,

Sham Gadale Art's College,

Dahiphal (Wadmauli)

Tq.KAJJ,.Dist. BEED.

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Impact Factor-7.675 (SJIF)** **ISSN-2278-9308**

# B.Aadhar

**Peer-Reviewed Indexed**
**Multidisciplinary International Research Journal**

## November -2020

**SPECIAL ISSUE**

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.S.N.Jadhavar**
**Head, Deptt. of History,**
**Sham Gadale Art's College,**
**Dahiphal (Wadmauli)**
**Tq.KAJJ,.Dist. BEED.**

## The Journal is indexed in:

**Scientific Journal Impact Factor (SJIF)**
**Cosmos Impact Factor (CIF)**
**International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**November - 2020**

**ISSUE No – CCLXIV (264)**

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.S.N.Jadhavar**
**Editor :**
**Head, Deptt. of History,**
**Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

**Dr.R.M.Hajari**
**Executive Editor:**
**Principal**
**Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.**

Aadhar International Publications

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani


| | | |
|---|---|---|
| 21 | स्त्रीवादी साहित्य — मुळाटे श्रीधर सुधाकर | 81 |
| 22 | 'राखीव सावल्यांचा खेळ' मधील स्त्री — प्रा. मोहन चव्हाण | 84 |
| 23 | १९९० नंतरच्या स्त्रीवादी कवितेतील जाणिवा — डॉ.फारुक अहमदसाब तांबोळी | 88 |
| 24 | स्त्री समाज सुधारक — प्रा.डॉ. शारदा गोविंदराव बंडे | 91 |
| 25 | गुप्तकालीन स्त्री जीवन — अमोल नानासाहेब मस्के | 93 |
| 26 | स्त्रीवाद : स्वरुप आणि संकल्पना — प्रा. अडसुळे एस. पी. | 95 |
| 27 | प्राचीन भारतीय विदुषी स्री रत्न घोषा और विश्ववारा का वैदिक ग्रंथों में योगदान — प्रा. विकास भानुदास टकले | 97 |
| 28 | भांडे – कपडे करणा–या स्त्री मजुरांची भुमिका व समस्या — डॉ. रविंद्र बापुराव शेंडे/ प्रा. स्वप्नील एस. बोबडे | 102 |
| 29 | राजमाता जिजाबाई कार्य की प्रासंगिकता — डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | 106 |
| 30 | महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व — प्रा. डॉ.आंधळे बी. व्ही. | 108 |
| 31 | ग्रामीण स्त्रियांच्या समस्या :एक ऐतिहासिक अभ्यास — डॉ बाबासाहेब शेप | 113 |
| 32 | मराठी कवितेतील स्त्री-जाणीवा — डॉ.कैलास इंगळे | 120 |
| 33 | अठराव्या शतकातील स्त्रीया आणि गुलामगीरी — डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट | 124 |
| 34 | लोकसाहित्य चळवळीच्या लोकनेत्या- डॉ. सरोजिनी बाबर — प्रा.डॉ. विकास शंकर पाटील | 127 |
| 35 | वाटचाल ८ मार्च ची — प्रा. ऍ. अल्का बाबाराव सोमवंशी | 130 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान — प्रमोद एस. मेश्राम | 133 |
| 37 | नाना शंकर शेठ यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य — डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 137 |
| 38 | जातक काल में नारी जीवन — डॉ० विश्वजीत कुमार नवीन | 143 |
| 39 | समकालीन कामकाजी महिला और जीवन संघर्ष भारतीय महिला: वर्तमान, भूत और भविष्य — डॉ. जितेन्द्र कुमार पयासी | 150 |
| 40 | मध्ययुगीन वेदनांची मुक्तीगाथा: संत सोयरा — विनायक पवार कृष्णा उत्तम नागरे | 152 |
| 41 | भारतातील महिलांची शैक्षणिक आणि आरोग्य विषयक सद्या स्थिती — कु. संगिता साहेबराव बोरसे | 155 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 264 (CCLXIV)
ISSN : 2278-9308
November, 2020

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व

**प्रा. डॉ.आंधळे बी. व्ही.**
राज्यशास्त्र विभाग कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी
मो.नं. 9423472755

**प्रस्तावना:-** स्त्री- पुरुष समानता, महिला सबलीकरण व स्त्रीवाद यासारख्या विविध संकल्पनांचा विचार आपण मांडतोत .स्त्री ही सक्षम झाली पाहिजे. तिला स्वातंत्र्य दिले पाहिजे. स्त्रीने घराबाहेर पडले पाहिजे. चुल आणि मुल ही संकल्पना आता जुनी झाली आहे. एकवीसाव्या शतकातील स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने नाही तर त्याच्याही पुढे गेली पाहिजे. यासर्व भाषणबाजीचा आपण वेळोवेळी विचार ऐकत आलो आहोत. परंतु आजही स्त्री ही मागास, अबला, व नारी पराया घर का धन म्हणुन समाजात वावरते. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये आजही स्त्री एक उपभोग्य वस्तू म्हणून ओळखली जाते. स्त्रीची ही दयनीय अवस्था असण्याचे एकमेव कारण म्हणजे स्त्रीला राजकीय प्रतिनिधित्व नाही. स्त्रीला राजकीय प्रतिनिधित्व अधिक मिळाले तर ती आपल्या विकासाचे कायदे करील.लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये योग्य प्रतिनिधित्वाने सर्व प्रश्न सोडवले जाऊ शकतात. विधिमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व असले पाहिजे तरच स्त्रीयांचे प्रश्न व समस्या सुटतील.

भारतीय लोकशाही ही जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे. जवळपास नव्वद कोटी लोक आपल्या मतदानाचा हक्क बजावून सरकार किंवा आपले प्रतिनिधी निवडतात. यात स्त्रियांचा वाटा हा पन्नास टक्के इतका असतो. काही ठिकाणी तर तो पुढे सुध्दा असतो . परंतु संसदेत स्त्री प्रतिनिधित्व बघितले तर ते वीस टक्के सुध्दा नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात कधीच स्त्रियांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही. भारतीय राजकारणात इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, जयललिता, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, मायावती यांनी आपला ठसा निर्माण केला. याशिवाय इतर ही क्षेत्रात स्त्रीया आज आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत.

महाराष्ट्र हे इतर राज्यांच्या तुलनेत पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. म.फुले, सावित्री बाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यासारख्या स्त्री सुधारकांनी महाराष्ट्रात स्त्री हक्कासाठी संघर्ष केला आहे.यामुळेच महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात स्त्रीया पुढे आल्या आहेत. यात लता मंगेशकर,मेधा पाटकर, माधुरी दिक्षित, सिंधूताई सपकाळ, सुरेखा पुणेकर ,निल्हम गोरे, मिरा बोरवणकर ,सुचित्रा महाजन ,सुप्रिया सुळे ,विजया राहाटकर ,पंकजा मुंडे, यशोमति ठाकुर यासर्व स्त्रिया आज आपापल्या क्षेत्रात यशस्वीपणे कार्य करत आहेत. याशिवाय महाराष्ट्र राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्था मधून महापौर, नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, सरपंच या विविध पदांवर स्त्रीया काम करत आहेत. मध्ययुगीन काळापेक्षा आजची परिस्थिती निश्चितच चांगली आहे. पण स्त्रीयांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ती समाधानकारक नाही.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 264 (CCLXIV)
ISSN : 2278-9308
November, 2020

**महाराष्ट्र विधिमंडळ :-** महाराष्ट्र विधिमंडळात राज्यपाल, विधान परिषद,विधानसभा यांचा समावेश होतो. विधान परिषद हे स्थायी व वरिष्ठ सभागृह आहे. याची सभासद संख्या ७८ अशी आहे. यात विविध क्षेत्रातून १२ सदस्य नेमण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. विधानसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. ज्याची सदस्य संख्या २८८ येवढी आहे. यांची निवड जनतेकडून प्रत्यक्ष मतदानातून केली जाते. ज्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो.

महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून आजपर्यंत विधानसभेच्या १३ सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत. या निवडणुकांमध्ये विविध राजकीय पक्ष आपले उमेदवार उभे करून सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. सभागृहामध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष सत्ता स्थापन करतो . महाराष्ट्र विधानसभेची पहिली सार्वत्रिक निवडणुक १९६२ मध्ये झाली. या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले आणि यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पहिले सरकार स्थापन झाले. या निवडणुकीत १३ महिला निवडून आल्या तर २०१९ च्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत २४ स्त्रियां आमदार झाल्या आहेत. महाराष्ट्र मतदार संख्यात्मक विचार करता पन्नास टक्क्यांच्या जवळपास स्त्री मतदार आहेत. तसेच मतदान प्रक्रियेत सुध्दा पुरुष मतदान टक्केवारीच्या जवळपास स्त्रीयांनी मतदान केले आहे. गेल्या काही निवडणुकीत स्त्री-पुरूष मतदान टक्केवारी दर्शविणारा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**स्त्री -पुरुष मतदान टक्केवारी दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रमांक | निवडणूक वर्ष | पुरुष मतदान % | स्त्री मतदान % | तृतीय लिंग मतदान % | एकुण मतदान % |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९६२ | ६७.७१% | ५४.५१% | - | ६०.३०% |
| २ | १९६७ | ६९.२२% | ६०.२५% | - | ६४.८४% |
| ३ | १९७२ | ६४.६९% | ५६.३८% | - | ६०.६३% |
| ४ | १९७८ | ७०.४९% | ६४.५५% | - | ६७.५९% |
| ५ | १९८० | ५८.०७% | ४८.२८% | - | ५३.३०% |
| ६ | १९८५ | ६२.०१% | ५६.१७% | - | ५९.१७% |
| ७ | १९९० | ६५.१९% | ५९.०८% | - | ६२.२६% |
| ८ | १९९५ | ७२.६८% | ७०.६४% | - | ७१.६९% |
| ९ | १९९९ | ६३.६२% | ५८.०३% | - | ६०.९५% |
| १० | २००४ | - | - | - | ६३.४४% |
| ११ | २००९ | ६१.५५% | ५७.२३% | - | ५९.५०% |
| १२ | २०१४ | ६४.३३% | ६१.६९% | ३७% | ६३.०८% |
| १३ | २०१९ | ६२.७७% | ५९.२६% | २५.४८% | ६१.०१% |

वरील तक्ता अभ्यासता असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या सर्व विधानसभा निवडणुकीत स्त्रीयांची मतदान टक्केवारी दोन तीन टक्के कमी आहे. पण इतकीही कमी नाही ज्याप्रमाणात विधानसभेतील प्रतिनिधित्व कमी

आहे. पुरुष प्रतिनिधित्वाच्या प्रमाणात स्त्री प्रतिनिधित्वाचे प्रमाण अत्यल्प आहे. मतदान करणे म्हणजे राजकीय सहभाग होत नाही तर स्त्रीयांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व करता आले पाहिजे. यासाठी त्यांना निवडून दिले पाहिजे. स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व दर्शविणारा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**महाराष्ट्र विधानसभेत स्त्री प्रतिनिधित्व दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रमांक | निवडणूक वर्ष | एकुण जागा | निवडणूक लढवली | निवडून आलेल्या | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९६२-१९६७ | २६५ | ३६ | १३ | ४.९०% |
| २ | १९६७-१९७२ | २७१ | १९ | ०९ | ३.३२% |
| ३ | १९७२-१९७७ | २७१ | ५६ | ०० | ००% |
| ४ | १९७८-१९८० | २८८ | ५१ | ०८ | २.७७% |
| ५ | १९८०-१९८५ | २८८ | - | १९ | ६.५६% |
| ६ | १९८५-१९९० | २८८ | - | १६ | ५.५५% |
| ७ | १९९०-१९९५ | २८८ | १४७ | ०६ | २.०८% |
| ८ | १९९५-१९९९ | २८८ | २४७ | ११ | ३.८१% |
| ९ | १९९९-२००४ | २८८ | ८६ | १२ | ४.१६% |
| १० | २००४-२००९ | २८८ | १५८ | १२ | ४.१६% |
| ११ | २००९-२०१४ | २८८ | २११ | ११. | ३.८१% |
| १२ | २०१४-२०१९ | २८८ | २७७ | २०. | ६.९४% |
| १३ | २०१९-२०२४ | २८८ | २३९ | २४. | ८.३३% |

वरील प्रमाणे महाराष्ट्र विधानसभेत स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले आहे.या तक्त्यावरून आपणास असे दिसून येते की, महाराष्ट्र विधानसभे आजही वीस टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले नाही. हीच परिस्थिती भारतातीलसर्व घटक राज्यांची व भारतीय संसदेची आहे. सध्याच्या लोकसभेत जेमतेम ५७ (१४.३%) स्त्रियां खासदार म्हणून निवडून आल्या आहेत. तर राज्यसभेत २५ स्त्रीया प्रतिनिधि आहेत.

भारतीय लोकशाही ही जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे. तसेच भारत लोकसंख्येच्याबाबतीत जगात दुसर्या क्रमांकाचा देश आहे. यात स्त्रियांची लोकसंख्या ही पन्नास टक्क्यांपर्यंत आहे. मतदार स्त्रीया तेवढ्याच आहेत. पण गेल्या काही निवडणुकीत पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची मतदान टक्केवारी काही राज्यामध्ये जास्त आहे. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुका मध्ये १६ राज्यात स्त्री मतदान टक्केवारी अधिक आहे. यात मिझोराम,मध्यप्रदेश,राजस्थान ही राज्य आहेत.

केवळ मतदान करून किंवा निवडणूक लढवून स्त्रियांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढला असे म्हणता येणार नाही. त्यासाठी त्यांना निवडून दिले पाहिजे. त्यांना पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री, खासदार व

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 264 (CCLXIV)
ISSN : 2278-9308
November, 2020

आमदार ही महत्त्वाची सार्वजनिक पदे स्त्रियांच्या हाती दिली पाहिजेत तरच भारतीय लोकशाही अधिक प्रगल्भ व सुसंस्कृत होईल.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**२०१९ विधानसभेतील २४ महिला आमदार**

**भाजपच्या महिला आमदार**

| महिला आमदार | |
|---|---|
| मंदा म्हात्रे | बेलापूर |
| मनिषा चौधरी | दहिसर |
| विद्या ठाकूर | गोरेगाव |
| भारती लव्हेकर | वर्सोवा |
| माधुरी मिसाळ | पर्वती |
| मुक्ता टिळक | कसबापेठ |
| देवयानी फरांदे | नाशिक मध्य |
| सीमा हिरे | नाशिक पश्चिम |
| श्वेता महाले | चिखली |
| मेघना बोर्डीकर | जिंतूर |
| नमिता मुंदडा | केज |
| मोनिका राजळे | शेवगाव |

**शिवसेनेच्या महिला आमदार**

| | |
|---|---|
| यामिनी जाधव | भायखळा |
| लता सोनवणे | चोपडा |

**काँग्रेसच्या महिला आमदार**

| | |
|---|---|
| वर्षा गायकवाड | धारावी |
| प्रणिती शिंदे | सोलापूर मध्य |
| प्रतिभा धानोरकर | वरोरा |
| सुलभा खोडके | अमरावती |
| यशोमती ठाकूर | तिवसा |

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आमदार**

| | |
|---|---|
| सरोज अहिरे | देवळाली |
| सुमनताई पाटील | तासगाव-कवठेमहंकाळ |
| अदिती तटकरे | श्रीवर्धन |

**अपक्ष महिला आमदार**

| | |
|---|---|
| गीता जैन, भाजप बंडखोर | मीरा-भाईंदर |
| मंजुळा गावित | साक्री |

**समारोप**:- महाराष्ट्र राज्य हे एक पुरोगामी व विकासाभिमुख राज्य मानले जाते. महाराष्ट्रात स्त्री पुरुष समानता संतपरंपरेपासून मान्य केली आहे .तसेच महाराष्ट्रात अनेक स्त्री समाज सुधारक होऊन गेले. सावित्रीबाई फुले पासून ते आजच्या तृप्ती देसाईंपर्यंतच्या स्त्रीयांनी त्यांच्या हक्क व अधिकारासाठी संघर्ष केला. आज यामुळेच महाराष्ट्रातील स्त्रीया इतर राज्यांच्या तुलनेत पुढे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आज महाराष्ट्रात स्त्रियां विविध पदांवर कार्यरत आहेत.

परंतु महाराष्ट्र विधिमंडळात महिला प्रतिनिधित्व हे अजूनही म्हणावे तसे वाढलेले नाही.३३% आरक्षणाचा विचार केला तरी आज ती संख्या ९६ एवढी असायला पाहिजे. पण याबाबत राजकीय पक्षांबरोबरच महाराष्ट्र राज्यातील जनता उदासिन असल्याचे दिसून येते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत २३९ स्त्रियांनी निवडणूक लढविली .पण यात केवळ २४ स्त्रियां निवडून आल्या. यात जवळपास १८९ स्त्रीयांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. आजही महाराष्ट्रात पारंपारिक राजकीय घराण्यातील स्त्रीयांच राजकारणात येवून निवडणूक लढवित आहेत. सामान्य स्त्री आजही एक शोषित, अबला, व दुर्बल म्हणून समाजात ओळखली जाते हे येणार्या काळासाठी अयोग्य आहे. स्त्री आणि राजकारण हे सुत्र आजही पुरोगामी महाराष्ट्राच्या पुरुषसत्ताक मानसिकतेत अंगवळणी पडले नाही असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची :-**

१] महाराष्ट्रातील राजकारण -चंद्रकांत भुजबळ

२] महाराष्ट्राचे सत्ताकारण –संपा. सुहास पळशीकर ,नितीन विरमल

३] सत्ता संघर्ष- सुहास पळशीकर

४] महाराष्ट्र शासन आणि राजकारण- प्रा. डॉ.विठ्ठल मोरे

५]https://web.archive.org/web/20191121065754/http://results.eci.gov.in/ACOCT2019/partywiseresult-S13.htm?st=S13

६] https://www.businesstoday.in/current/economy-politics/assembly-election-2019-dates-live-updates-maharashtra-haryana-polls-schedule-results-election-commission/story/380440.html

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani